वाचा :- 1. मुख्याधिकारी, नगर परिषद,वसमत यांनी सादर केलेला अर्थसंकल्प जा.क्र.लेखा/5103 / 2015-16 दि.23/03/2015
2. नगर परिषदेची सभा ठराव क्र. दिनांक.26/02/2015.
3. अर्थसंकल्पीय मान्यता पृष्ठांक क्र.3 दिनांक. /07/2015.

2555

जा.क्र.2015/नपाप्र/कावी / 338
**जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली**
दिनांक. 27 /07/2015

आदेश

महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 101 (4) अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी **तुकाराम कासार जिल्हाधिकारी**, मुख्याधिकारी, नगर परिषद वसमत यांनी सादर केलेल्या सन 2015-16 या वित्तीय वर्षाच्या अर्थसंल्पीय अंदाजपत्रकास खालील अटीवर मान्यता देत आहे.

अटी व शर्ती

1. वसमत,नगर परिषदेने कर्जाची सविस्तरं नोंदवहीत नोंद घेऊन जास्तीत जास्त परतफेड बाबत उपाययोजना करांवी.
2. महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाची थकित रक्कम अदा करण्यासाठी जास्तीत जास्त तरतूद करुन थकाबाकी भरणा करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
3. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, बिगर सिंचन पाणीपट्टीची थकित रक्कम अदा करणेसाठी पुर्वविनियोजन व्दारे जास्तीत जास्त तरतूद करुन थकबाकी भरणा करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
4. वसुलीची टक्केवारी अत्यंत असमाधानकारंक असल्यामुळे वसुलीची खास मोहिम राबवून वसुली 100% पुर्ण होईल याबाबत प्रयत्न करावे.
5. करापासुन एकही इमारत किंवा घर हे विनामालमत्ता कराचे राहु नये याची दक्षता घ्यावी.
6. समायोजित न केलेल्या अग्रीमाची रक्कम लेखासंहिता 1971च्या नियमानूसार समायोजित करण्यात यावे.
7. जाहिरात खर्च,फरनिचर खरेदी,छपाई वरील खर्च स्वागत संमारंभ ,प्रवास खर्च ,सांस्कृतीक कामावरील खर्च अनूदान देणग्या इत्यादी खर्चात काटकसर करावी.
8. मागसवर्गिय कल्याणकारी योजनावर नियमा अनव्ये तरतूद ठेवून मागिल अनूशेषासह आर्थिक वर्षात खर्च पूर्ण करावा.
9. महीला व बालकल्याण कार्यक्रमासाठी नियमा अन्वये तरतूद ठेवून मागिल अनूशेषासह आर्थिक वर्षात खर्च पूर्ण करावा.
10. वेतन राखीव निधी ,पाणीपूरवठा राखीव निधी,महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळाचे विद्यूत बिल इत्यादी बाबत नियमा नूसार तरतूद ठेवून राष्ट्रीयकृत बॅकेत मूदतठेव प्रमाणपत्र काढण्यात यावे.

11. अर्थसंकल्पीय तरतूदीनूसार खर्च करताना महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 आणी महाराष्ट्र नगर पालिका ,नगर पंचायती व औद्यगिक नगरी अधिनियम 1965 तसेच स्थाई निर्देश ,शासन निर्णया मधील तरतूदीचें काटेकोरपणे पालन करण्यात यावे .
12. वसमत नगरपरिषदे ने निश्चितं केलेल्या धोरणानूसार अनाधिकृत नळजोडणी तात्काळ बंद करावी व जनतेच्या आवश्यकते नूसार नियमान्वये नळजोडणी नियमीत करावी.
13. वरील सर्व बाबीची काटेकोरपणे अंमलबजावणी करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी सादर करावा.
14. द्विनोंद लेखा पध्दती चा अवलंबन करण्यात यावे.

2-a-81207-17

तुकाराम कासार
जिल्हाधिकारी हिंगोली

प्रतिलीपी,

1) मा.प्रधान सचिव नगर परिषद प्रशासन संचलनालय शासकिय परिवहन सेवा इमारत 3 रा मजला सरपोच खानावाला मार्ग वरळी मूंबई -30 यांना माहिती स्तव सादर.
2) मा विभागिय आयूक्तं औरंगाबाद यांना महितीस्तव सादर.
3) मा अध्यक्ष नगर परिषद वसमत यांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस्तव.
4) मूख्यधिकारी नगर परिषद वसमत यांना उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस्तव व अनूपालन स्तव .
5) एन.आय.सी विभाग जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली यांना प्रसिध्दीस्तव.

जिल्हाधिकारी हिंगोली करीता